दैनिक अजिंक्य भारत
12 Aug 2025 - Page 12

# विद्यामंदिर कन्या विद्यालय येथे विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा जनजागृती



**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. ११ :** विद्यामंदिर कन्या शाळा येथे सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमात शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयाचे सायबर वॉरियर्स साक्षी दिनेश शिरसाट व प्रणाली विजय दवणे यांनी विद्यार्थ्यांना ऑनलाइन सुरक्षिततेचे महत्त्व पटवून दिले. सोशल मीडियाचा योग्य वापर, वैयक्तिक माहितीचे संरक्षण, फसवे संदेश ओळख, सायबर बुलिंग प्रतिबंध या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. कार्यशाळेत विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करून मोबाइलचा योग्य उपयोग करण्यासाठी शपथ दिली. ही कार्यशाळा शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय अकोलाचे प्राचार्य डॉ. जे. एम. साबू, समन्वयक डॉ. दीप्ती पेटकर यांच्या सहयोगाने घेण्यात आली व मुख्याध्यापक माधुरी ठाकूर यांनी अशा कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये जबाबदार डिजिटल सवयी विकसित होतात, असे सांगितले.